RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-अ

वर्ष ४, अंक ३९] बुधवार, जुलै १८, २०१२/आषाढ २७, शके १९३४ [पृष्ठे ७
किंमत : रुपये १४.००

असाधारण क्रमांक १००

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जुलै २०१२

### अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक आपना. २०११/प्र.क्र. ३७/पापु-१५.––भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि या संदर्भात करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखालील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालयातील वरिष्ठ खोदन अभियंता, गट-अ आणि उप अभियंता (यांत्रिकी), गट-अ, महाराष्ट्र भूजल सेवा या पदांवरील सेवाप्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहेत :––

१. या नियमांना, महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखालील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालयातील वरिष्ठ खोदन अभियंता गट अ, आणि उप अभियंता (यांत्रिकी) गट अ, महाराष्ट्र भूजल सेवा, सेवाप्रवेश नियम २०१२ असे म्हणावे.

२. या नियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(ब) " पदवी " याचा अर्थ, सांविधानिक विद्यापीठाची पदवी ;

(क) " विभाग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ;

(ड) " संचालक " याचा अर्थ, संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे ;

(ई) " संचालनालय " याचा अर्थ, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र शासन.

(फ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन.

३. संचालनालयातील वरिष्ठ खोदन अभियंता (गट-अ), महाराष्ट्र भूजल सेवा या पदावर एकतर,—

(अ) उप अभियंता (यांत्रिकी), गट-अ हे पद धारण करणाऱ्या आणि त्या पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा केलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता लक्षात घेऊन काटेकोर निवडीच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन नियुक्ती करण्यात येईल ; किंवा

(ब) जे उमेदवार—

(एक) ४५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नाहीत ;

परंतु, अगोदरच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिल करण्यात येईल,

(दोन) यंत्र अभियांत्रिकी किंवा स्वयंचलित अभियांत्रिकी यामधील पदवी अथवा शासनाने तिच्या समतुल्य म्हणून घोषित केलेली अर्हता धारण करीत आहेत ;

(तीन) उद्योगामध्ये किंवा शासकीय विभागामध्ये किंवा शासनाने स्थापन केलेल्या कोणत्याही औद्योगिक उपक्रमामध्ये/महामंडळामध्ये/मंडळामध्ये जबाबदारीच्या पदावर, विविध रचनांमध्ये विविध प्रकारच्या वेधनयंत्रांनी वेधन करण्याचा किमान पाच वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव असलेले आहेत आणि वेधनयंत्रे, वायूसंपीडक (air compressor), डिझेल यंत्रे व द्रवचालित प्रणाली, उत्पादक चाचणी साधनसामुग्री, विविध प्रकारचे पंप संच यांचे परिरक्षण व दुरुस्ती करण्याचे पुरेसे ज्ञान असलेले आहेत,—

—अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात येईल :—

परंतु, (आणखी असे की) असामान्य शैक्षणिक अर्हता अथवा अनुभव अथवा दोन्हीही असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

४. संचालनालयातील उप अभियंता (यांत्रिकी) (गट-अ) या पदावर एकतर,—

(अ) संचालनालयामध्ये शाखा अभियंता हे पद धारण करणाऱ्या आणि यंत्र अभियांत्रिकी किंवा स्वयंचलित्र अभियांत्रिकी यामधील पदवी वा पदविका धारण करणाऱ्या आणि विविध दगडी रचनांमध्ये जलकुप वेधन करण्याचा, वातिक यंत्रसामग्री व साधनसामग्री यांचे कार्यचालन व परिरक्षण करण्याचा अनुभव असणाऱ्या तसेच,—

(एक) पदवी धारकाच्या बाबतीत त्या पदावर किमान तीन वर्षांच्या नियमित सेवा केलेल्या ;

(दोन) पदविका धारकाच्या बाबतीत त्या पदावर किमान आठ वर्षांची नियमित सेवा केलेल्या ;

–व्यक्तीमधून, योग्यतेनुसार ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन नियुक्ती करण्यात येईल ; किंवा

(ब) जे उमेदवार,––

(एक) ४० वर्षांपेक्षा अधिक वयाचे नाहीत ; परंतु अगोदरच शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथील करण्यात येईल ;

(दोन) यंत्र अभियांत्रिकी किंवा स्वयंचलित अभियांत्रिकी यामधील पदवी अथवा शासनाने तिच्या समतुल्य म्हणून घोषित केलेली अर्हता धारण करीत आहेत ;

(तीन) शासनाच्या विभागामध्ये, किंवा शासनाने स्थापन केलेली औद्योगिक संघटना अथवा कोणताही औद्योगिक उपक्रम/स्थानिक प्राधिकरण/महामंडळ/मंडळ यामध्ये जबाबदारीच्या पदावर, अंतर्दहन, वायूसपीडके, लघुकाम व जडकाम वाहने, वेधन उपकरणसंच वा संबंधित यंत्रसामग्री हाताळणीमधील किमान तीन वर्षांचा अनुभव धारण करीत आहेत,––

––अशा उमेदवारांमधून नामानिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात येईल; परंतु, असामान्य शैक्षणिक अर्हता अथवा अनुभव अथवा दोन्हीही असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

५. नियम ३ व ४ यांमध्ये उल्लेखिलेल्या पदावर पदोन्नती व नामनिर्देशन यांद्वारे ५० : ५० या प्रमाणात नियुक्ती करण्यात येईल.

६. नियत ३ व ४ यांमध्ये उल्लेखिलेल्या पदांवर नामनिर्देशनांद्वारे नियुक्ती केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल. परिविक्षाकाल जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविता येईल. पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने त्या पदाकरिता विहित केलेले प्रशिक्षण घेणे व विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आणि परिविक्षाकाल यशस्वीरीत्या पूर्ण करणे आवश्यक आहे. जर त्याने/तिने परिविक्षाकाल यशस्वीरित्या पूर्ण केला नाही किंवा विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली नाही किंवा त्या पदाकरिता तो/ती योग्य नसल्याचे आढळून आले तर, त्याची/तिची सेवा समाप्त करण्यास तो/ती पात्र असेल.

७ नियम ३ व ४ यांमध्ये उल्लेखिलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीने विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील अथवा या उत्तीर्ण होण्यातून तिला सूट मिळालेली नसेल तर, या संदर्भात करण्यात आलेल्या नियमांनुसार या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

८. नियम ३ व ४ यांमध्ये उल्लेखिलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून विहीत करण्यात आलेले संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असेल.

९. नियम ३ मध्ये उल्लेखिलेल्या पदांवर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही तिची बदली केली जाण्यास पात्र असेल.

१०. नियम ४ मध्ये उल्लेखिलेल्या पदांवर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही तिची बदली केली जाण्यास पात्र असेल, आणि जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामध्ये उप अभियंता (यांत्रिकी) या पदावर प्रतिनियुक्ती केली जाण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मालिनी वि. शंकर**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

## WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 12th July 2012

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Apna. 2011/C.R. -37/Papu-15.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, and in supersession of all existing rules, orders and instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, regulating recruitment to the posts of the Senior drilling Engineer, Group-A, and the Deputy Engineer (Mechanical), Group-A, in the Directorate of Groundwater Surveys and Development Agency, Maharashtra Groundwater service, Maharashtra State under the Water Supply and Sanitation Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Senior Drilling Engineer, Group-A and the Deputy Engineer (Mechanical), Group-A, in the Directorate of Groundwater Surveys and Development Agency, Maharashtra Groundwater Service, Maharashtra State under the Water Supply and Sanitation Department (Recruitment) Rules, 2012.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) " Commission " means the Maharashtra Public Service Commission ;

(*b*) " Degree " means a degree of a statutory University ;

(*c*) " Department " means the Water Supply and Sanitation Department of Government of Maharashtra ;

(*d*) " Director " means the Director of Groundwater Surveys and Development Agency, Maharashtra State, Pune ;

(*e*) " Directorate " means the Directorate of Groundwater Surveys and Development Agency, Maharashtra State ;

(*f*) " Government " means Government of Maharashtra.

3. Appointment to the post of Senior Drilling Engineer Group-A, in the Directorate, shall be made either,—

1. by promotion of a suitable person on the basis of strict selection with due regard to seniority, from amongst the persons holding the post of Deputy Engineer (Mechanical), Group-A, having not less than three years regular service in that post; or

2. by nomination from amongst the candidates who,—

(*i*) are not more than forty-five years of age :

Provided that, the upper age limit may be relaxed up to five years for the candidates who are already in the service of Government.

(*ii*) possess a degree in Mechanical Engineering or Automobile Engineering or qualification declared by the Government to be equivalent thereto :

(*iii*) possess practical experience for a period of not less than five years in drilling in different formations with different types of drilling machines and have adequate knowledge of maintenance and repairs of drilling machines, air compressors, diesel engines and hydraulic system, yield testing equipment, various types of pumping sets, in a responsible position in Industry or in Government Department or in any Industrial undertaking or Corporation or Board established by the Government :—

Provided that, preference shall be given to the candidates possessing exceptional educational qualifications or experience or both.

4. Appointment to the post of Deputy Engineer (Mechanical) Group-A, in the Directorate shall be made either,—

(a) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness, from amongst the persons holding the post of Sectional Engineer in the Directorate and possess a degree or diploma in Mechanical Engineering or Automobile Engineering; and experience in water well drilling in different rock formations, operations and maintenance of pneumatic machinery and equipments, having not less than—

(*i*) three years regular service in that post in case of degree holder; or

(*ii*) eight years regular service in that post in case of diploma holder ; or

(b) by nomination from amongst the candidates who,—

(*i*) are not more than forty years of age :

provided that, the upper age limit may be relaxed up to five years for the candidates who are already in the Government service ;

(*ii*) possess a Degree in Mechanical Engineering or Automobile Engineering or qualification declared by the Government to be equivalent therto ;

(*iii*) possess an experience for a period of not less than three years in handling internal combustion, air compressors, light and heavy duty vehicles, drilling rigs or related machinery in a responsible position in Government Department or Industrial Organisation or any Industrial undertaking or Local Authority or Corporation Board Established by Government :

Provided that, preference shall be given to a candidate possessing exceptional educational qualifications or experience or both.

5. Appointment to the posts mentioned in Rules 3 and 4 by promotion and by nomination shall be made in the ratio of 50:50.

6. A person appointed to the post mentioned in Rules 3 and 4, by nomination shall be on probation for a period of two years. Probation period may be extended maximum up to one year. Person appointed to the post shall be required to undergo such training and pass the departmental examination as may be prescribed for the post and complete the probation period satisfactorily. If he does not complete the probation period satifactorily or does not pass the prescribed departmental examination or is found unsuitable for the post, then he shall be liable to be terminated from the service without any prior notice.

7. Persons appointed to the posts mentioned in Rules 3 and 4 shall be required to pass Hindi and Marathi Languages examinations according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing the Examinations.

8. A person appointed to the posts mentioned in Rules 3 and 4 should possess a certificate in Computer Operation, prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra, from time to time.

9. A person appointed to the post mentioned in Rules 3 shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

10. A person appointed to the post mentioned in Rule 4 shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra and shall be liable to be appointed on deputation to the post of Deputy Engineer (Mechanical) in the Rural Water Supply Department of a Zilla Parishad.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MALINI V. SHANKAR,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004., EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.